संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६९/२०२३

नि.क्रं. ९/सी

**<u>सरकारी पक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ शपथेवर कथन करतो की</u>**-

माझे नाव - शिवाजी नामदेव पाटील

वय - ५० वर्षे, व्यवसाय - नोकरी

राहणार - सडोली खा., ता: करवीर , जि: कोल्हापूर

**<u>सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एस.बी.कांबळे यांचे मार्फत -</u>**

**१.** दि. २२/०४/२०२३ रोजी मी राज्य उत्पादन शुल्क राधानगरी, येथे जवान म्हणून कार्यरत होतो. सदरील दिवशी दुय्यम निरिक्षक राक्षे साहेब यांना मिळालेल्या अवैध दारु विक्रीच्या गुप्त माहितीनुसार तळगाव ता.राधानगरी येथे छापा टाकला. दोन पंच, मी, राक्षे साहेब आणि रेडिंग स्टाफ असे खाजगी वाहनाने घटनास्थळी गेलो. सदरील ठिकाणी एक इसम आपले कब्जेत एक काळी रबरी इनर त्यात अंदाजे ४० लीटर गावठी हातभट्टी दारू, एक प्लॅस्टीक बादली आणि ५ काचेचे ग्लास असा एकूण मुद्देमाल रक्कम रु.२२५०/- चा मिळून आला. साहेबांनी त्याचेकडे चौकशी केली असता दारू विक्रीचा कोणताही परवाना नसलेचे त्यांनी सांगितले. साहेबांनी त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव हणमंत दत्तात्रय गुरव रा.तळगाव असे सांगितले.

**२.** सदरील मुद्देमाल जप्त केला. त्यातील दोन बाटल्या नमुणा पथकरणासाठी साहेबांच्या व पंचाच्या सहीचा कागद लावून लाखी सिल ने बंद केला. पंचनामा करून जप्त मुद्देमाल साहेबांनी आपले कब्जेत घेतला. कार्यालयात मी घडले प्रकाराबाबत रीतसर फिर्याद दिली. आता मला ती दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१०/PW1** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो.आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. मुद्देमाल

पाहिल्यास ओळखू शकतो.

**३.** दि.०४/०५/२०२३ रोजी नमुना पृथ्थकरणासाठी काढलेली एक बाटली साहेबांच्या लेखी आदेशानुसार मी न्यायप्रयोगशाळा कोल्हापूर येथे घेऊन गेलो. ती मी न्यायप्रयोगशाळेत जमा करून त्याची पोहोच मी या कामात सादर केली आहे. आता मला सदरील लेखी पत्र दाखविण्यात आला. त्यावर राक्षे साहेब आणि माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर न्यायप्रयोगशाळेची पोहोच देखील आहे. त्यास **नि.११/PW1** देण्यात येते. मी आरोपीस ओळखतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. मी मुद्देमाल पाहिल्यास ओळखू शकतो.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ वकील श्री.यु.एम.मानकर यांचे मार्फत -**

**४.** हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी न्यायालयासमोर मुद्देमाल हजर नाही. हे म्हणणे खरे आहे की, या कामातील पंचांनी राज्य उत्पादन शुल्कच्या अनेक कामांमध्ये पंच म्हणून काम पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, या कामात फिर्यादी आणि कॅरीअर म्हणून मीच काम पाहिले आहे. या कामामध्ये कॅरीअर म्हणून माझा जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अंदाजे १२ दिवसांनी मी नमूना पृथ्थकरणासाठी सदरील नमुना न्यायप्रयोगशाळेत घेऊन गेलो. हे मला लक्षात नाही की, सदरील वेळी मी इतर कामातील देखील नमुना बाटल्या न्यायप्रयोगशाळेत घेऊन गेलो होतो किंवा कसे. सदरील १२ दिवसांकरीता नमुना बाटली ही राक्षे साहेबांच्या कार्यालयीन कब्जेत ठेवली होती.

**५.** मला खाजगी वाहनाचा क्रमांक आठवत नाही. छापा टाकणेस जाणेपुर्वी तशी नोंद आमचे नोंदवहीस घेतलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटा मजकूर नमूद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बेकायदा दारू विक्रीच्या केसेस

आम्ही दाखल करतो. हे म्हणणे खरे नाही की, केसेस दाखविणेकरीता आरोपीविरुद्ध खोटी फिर्याद दाखल करून आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/-

राधानगरी (एन. पी. काकडे)

दिनांक.०५/११/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी.